# कॉक्सिटच्या विद्यार्थ्यांची ' विप्रो ' मध्ये निवड

लातूर (दि.२९) - येथील अंबेजोगाई रोड वरील संगणकशास्त्र व माहितीतंत्रज्ञान महाविद्यालय (कॉक्सिट) यातील चार विद्यार्थ्यांची विप्रो टेक्नॉलॉजीज या एमएनसी सॉफ्टवेअर कंपनीमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून निवड झाली आहे.

कॉक्सिटच्या यशस्वी शैक्षणिक परंपरेला अनुसरून २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात एकूण ५१ विद्यार्थ्यांची आयटी कंपनीत निवड झाली आहे.पुणे, मुंबई येथे विप्रो कंपनीकडून घेतलेल्या मुलाखतीत तृतीय वर्षात शिकणा-या प्रियंका जाधव (बीएस्सी सीएस.), पुजा बाहेती (बीएस्सी सीएस.), सुरभी स्वामी (बीएस्सी सी.एस.) आणि जयश्री बनसोडे (बी.सी.ए.) या विद्यार्थ्यांची सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणुन निवड झाली आहे. तर सिराज मुद्दसिक (एमएस्सी सॅन) याची माय एन्टरप्रायजेस सर्व्हिसेस सॉफ्टवेअर कंपनीत नेटवर्क इंजिनिअरपदी निवड झाली आहे. तृतीय वर्षातील निकाल व लगेच जॉब अशी सुवर्णसंधी मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला आहे.

यापूर्वी विप्रो कंपनीत ३८, तर इन्फोसिस, टीसीएस, टेक महिंद्रा, ट्रीनिटी केटीपी यांच्या मुलाखतीत ९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. ट्रेनींग व प्लेसमेंट सेलकडून विद्यार्थ्यांची कंपनीच्या मुलाखतीसाठी सॉफ्ट स्किल, ॲप्टीट्युड टेस्ट व स्पोकन इंग्लीशची सातत्याने तयारी करून घेतली जात असल्यामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे.

यापुढील काळात नामांकित सॉफ्टवेअर कंपन्या कॉलेजमध्ये येणार असल्याने सर्व विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत करून कॅम्पस मुलाखतीत यशस्वी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ.एम.आर.पाटील यांनी केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे उपप्राचार्य डॉ.बी.एल.गायकवाड, उपप्राचार्य एन.एस.झुल्पे, ट्रेनींग प्लेसमेंट ऑफीसर प्रा.किशोर जेवे, ॲप्टीट्युड सेलचे प्रमुख प्रा. एल.एम पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांनी अभिनंदन केले.



**Bansode Jayshri**
**Wipro**



**Jadhav Priyanka**
**Wipro**



**Swami Surbhi**
**Wipro**



**Bahiti Pooja**
**Wipro**



**Shiraj Musaddique**
**MY Enterprises**